Yashoda Shikshan Prasarak Mandal's
**YASHODA TECHNICAL CAMPUS,**
**Faculty of Pharmacy, Satara.**
NH-4, Wadhe Phata, Satara. Tele Fax- 02162-271238/39/40
Website- www.yes.edu.in, Email-director_ytc@yes.edu.in
Approved by AICTE, PCI. New Delhi, Govt. of Maharashtra (DTE, Mumbai)
Affiliated to DBATU Lonere & Shivaji University, Kolhapur/ MSBTE, Mumbai.
**Institute Code – 6757**

YSPM
NAAC B+

**Prof. Dasharath Sagare**
**Founder, President**

**Dr. V. K. Redasani**
**Principal**

**Ref No:- YSPM/YTC/NOTIC/ 188 /2024-25** **Date:-29/03/2025**

# नोटीस

डी. फार्मसी विभागातील द्विव्यांग विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, उन्हाळी परीक्षा 2025 साठी बसणाऱ्या द्विव्यांग विद्यार्थी त्यांना लेखी परिक्षासाठी MSBTE परीक्षा केद्रांकडुन वेळ वाढवून मिळण्यासाठी किंवा लेखनिक मिळवण्याकरिता खालील कागदपत्रांची पुर्तता दि. 01/04/2025 पर्यंत महाविद्यालयात परिक्षा विभागात जमा करावीत. अथवा स्वत: विद्यार्थी जबाबदार राहिल याची विद्यर्थ्यानी नोंद घ्यावी.

खालील विद्यार्थ्याची आवश्यक कागदपत्रे :–

- <u>लेखी परिक्षेसाठी वेळ वाढवून मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे</u>
  1. संबंधित विद्यार्थ्याचा अर्ज
  2. संबंधित विद्यार्थ्याचे 40% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्याकीय प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत.
  3. विद्यार्थ्याचा नोंदणी क्रमांक (Enrollment No) सत्र (Semester) उदा. PH1J
- <u>लेखनिक मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे</u>
  1. संबंधित विद्यार्थ्याचा अर्ज
  2. विद्यार्थी असमर्थ असल्याचे डॉक्टराचे वैद्याकीय प्रमाणपत्र
  3. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे बोनॉफाईट सर्टिफिकेट
  4. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे न हरकत प्रमाणपत्र
  5. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी हा तंत्रिक शिक्षण न घेतलेला व 10वी पर्यंत शिकलेला असावा.
  6. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षर्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

संपर्क :– 8421739001 श्री. वसीम शेख (परीक्षा विभाग)

Yashoda Technical Campus, Satara * (D.Pharmacy) * MSBTE Inst.Code 1563

**Principal**
**Yashoda Technical Campus**
**Faculty of Pharmacy, Satara**

# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
## विभागीय कार्यालय, पुणे

( स्वायत्त ) ( ISO 9001:2015 ) ( ISO/IEC – 27001:2013)
४१२/ब, मंडळाची इमारत, चौथा मजला, बहिरट पाटील चौक,
मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६
Email :rbtepn@msbte.com दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४ Web. www.msbte.org.in


जा.क्र. मरातंशिमं/विकापु/विवि/उ.प. २०२५/ज्यादा तास/लेखनिक २०२५/296 दिनांक :– 28 MAR 2025.

**वेब परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय** – उन्हाळी परीक्षा २०२५ मध्ये आपल्या संस्थेतील द्विव्यांग परीक्षार्थीकरीता वेळ वाढवून/लेखनिक मिळणेबाबतचे अर्ज सादर करणेबाबत.

**संदर्भ** – १. श्री. के. वाय. पाटील, सहा. सचिव, (तांत्रिक) यांचा दि. २८/०३/२०२५ रोजीचा ईमेल.
२. शासन निर्णय क्रं. संकिर्ण -२०१६/पत्र क्रं. ३०२/विशि-३/ दि.०४/०३/२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई या मुख्यालयामार्फत उन्हाळी व हिवाळी पदविका परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा कालावधीत या कार्यालयास संस्थेतील द्विव्यांग परीक्षार्थीकरीता मंडळाच्या परीक्षा नियमावलीच्या पुस्तकातील नियम क्र. RG-10(G) प्रमाणे संस्था प्रमुखांमार्फत लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून मिळणेबाबत तसेच परीक्षार्थ्यांस लेखनिक मिळणेबाबत अर्ज प्राप्त होतात. सदरचे परिक्षार्थीचे अर्ज या विभागीय कार्यालयास सादर करताना संस्था प्रमुखांनी खालील बाबी पडताळून व पत्रामधील संस्थेच्या प्राचर्यांनी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश द्विव्यांग राखीव जागेतून झाला किंवा कसे? याबाबतचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच, लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून देणे अथवा लेखनिक मिळणे याबाबतची शिफारस करतांना संदर्भ पत्र क्रं. २ चे अवलोकन करावे. संबंधित विद्यार्थी संदर्भ पत्र क्रं. २ मध्ये नमुद केलेल्या नियमाप्रमाणे पात्र असल्यासच या कार्यालयाकडे शिफारस करण्यात यावी. तसेच, परीक्षेसाठी संदर्भ पत्र क्रं. २ मधील तरतुदींचा नियोजन करणे आवश्यक आहे. **सदर विद्यार्थ्यांचे अर्ज व खालील दिलेल्या तक्त्यात द्विव्यांग परिक्षार्थीची माहिती भरुन खालील आवश्यक कागदपत्रांसहीत दि. ०२/०४/२०२५ पर्यंत या कार्यालयास या कार्यालयास सादर करावित.**

| Sr. No. | Instt. Code | Instt. Name | Enrollment No. | Student Name | Course Code | Disability Type | Request For Extra Time (Yes/No) | Request For Writer (Yes/No) | Writer Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

- लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून मिळणेबाबत.
  १. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
  २. संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज.
  ३. संबंधित विद्यार्थ्यांचे ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची सांक्षाकित छायांकित प्रत.
  ४. विद्यार्थ्यांचा नोंदणी क्रमांक (Enrollement No.) , सत्र (Semester) उदा. CE4G.

- लेखनिक मिळणेबाबत.
  १. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
  २. संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज.
  ३. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
  ४. लेखनिक म्हणून बसणा–या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
  ५. लेखनिक म्हणून बसणा–या विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या शाळाचे ना हरकत प्रमाणपत्र.
  ६. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिक शिक्षण न घेतलेला व १० वी पर्यंतच शिकलेला असावा.
  ७. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

लेखनिकाची व्यवस्था पालकांनी महाविद्यालयाचे सहकार्याने करावी. अन्यथा महाविद्यालयाने लेखनिकाची यादी ठेवावी व या यादीतून लेखनिक देण्यात यावा. आवश्यक्तेनुसार सांकेतिक भाषा विश्लेषक ( Sign Language interpreter) उपलब्ध करुन दयावा.

उपरोक्त अर्ज हे दि.०२/०४/२०२५ पर्यंतच या कार्यालयास प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच संस्थेच्या पत्रात संस्था प्रमुखांचा तसेच सदर विषय हाताळणा–या लिपिकाचा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी (Mobile No. & E-mail ID) नमूद करणे अपरिहार्य आहे.

**जर परीक्षेआधी एक किंवा दोन दिवस संस्थांकडून अर्ज प्राप्त झाले व त्यानंतर संस्था प्रतिनिधींनी दूरध्वनीव्दारे सदर प्रकरणाचा निपटारा करण्यास घाई केली व सदरचे पत्र टपाल खात्याकडून संस्थेस उशिरा प्राप्त झाले व त्यामुळे जर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले तर या गोष्टीस संस्था प्रमुख जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.**

**अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्यांचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परिक्षार्थीच्या बाबतीत घडली तरच अशा अर्जाचा विचार करण्यात येईल.**

**कोणताही द्विव्यांग विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहाणार नाही, याची खबरदारी प्राचार्यांनी घ्यावी.**

28/3/25

(डॉ. विजय मा. कोल्हे)
उपसचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय पुणे १६